# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:04.04.2026** **वारः शनिवार**

1. स्वदेशी बनावटीची आयएनएस तारागिरी, ही अत्याधुनिक युद्धनौका नौदलाच्या ताफ्यात दाखल
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती; त्यांच्या विचारांचा उत्सव म्हणून साजरी करण्याचं, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं आवाहन
3. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त राज्यभरातून आदरांजली
4. आणि
5. नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी इथं कार विहिरीत कोसळल्यानं एकाच कुटुंबातील 9 जणांचा मृत्यू

**आयएनएस तारगिरी**

स्वदेशी बनावटीची आयएनएस अरिदमन ही अणु पाणबुडी तसंच आयएनएस तारागिरी ही अत्याधुनिक युद्धनौका काल नौदलाच्या ताफ्यात दाखल झाली. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत आंध्रप्रदेशच्या विशाखापट्टणम इथे हा नेत्रदीपक सोहळा पार पडला. 'शब्द नाही, शक्ति आहे, 'अरिदमन'!' असं नमूद करत राजनाथ सिंह यांनी या पाणबुडीचा गौरव केला. आयएनएस तारागिरी या अत्याधुनिक युद्धनौकेची बांधणी माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेडनं केली आहे. 2047पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्यासाठी सागरी शक्ती अत्यंत महत्त्वाची आहे; आयएनएस तारागिरी नौदलाच्या ताफ्यात दाखल झाल्यानं, नौदलाची युद्धसज्जता आणि तांत्रिक क्षमता वाढली आहे, असं राजनाथ सिंह यावेळी म्हणाले. सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान, नौदलप्रमुख दिनेश त्रिपाठी आणि व्हाइस ॲडमिरल संजय भल्ला यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी या समारंभाला उपस्थित होते.

**काळा बाजार**

एलपीजी आणि इतर पेट्रोलियम उत्पादनाची साठेबाजी आणि काळाबाजार रोखण्यासाठी राज्यांनी आणि केंद्रशासित प्रदेशांनी आवश्यक ती कारवाई करावी असे निर्देश केंद्र सरकारनं दिले आहेत. काही भागांमध्ये अफवा आणि चुकीच्या माहितीमुळे अनावश्यक चिंता आणि भीती निर्माण होत आहे, त्याला आळा घालण्यासाठी इलेक्ट्रॉनिक माध्यमातून योग्य माहिती वेळोवेळी प्रसारित होईल याची राज्यांनी खात्री करावी असं पेट्रोलियम आणि नैसर्गिक गॅस मंत्रालयाचे सचिव डॉक्टर नीरज मित्तल यांनी राज्यांना लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे. देशात कच्च तेल, पेट्रोल आणि डिझेल पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे असंही यात स्पष्ट केलं आहे.

**गोयल**

जनविश्वास तरतुदी सुधारणा विधेयक 2026 ला मंजुरी मिळाल्यामुळे; गुन्हेगारी स्वरूपाच्या कारवाईच्या कक्षेत येणाऱ्या 1000 प्रकरणांना या कक्षेतून बाहेर काढण्यात आलं आहे. 1 हजार 900 केंद्रीय कायद्यांमध्ये सुधारणा झाली आहे असं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी सांगितलं. ते काल नवी दिल्लीमध्ये पत्रकार परिषदेत बोलत होते. यामुळे सर्वसामान्य नागरिकांबरोबरच व्यवसाय आणि लघु आणि मध्यम उद्योगांना लाभ मिळणार आहेत. नवोन्मेषाला चालना मिळण्याबरोबरच उद्यमशील क्षमतेमध्ये वाढ होऊन देशाच्या अर्थव्यवस्थेची जागतिक स्पर्धात्मक अर्थव्यवस्थेकडे अधिक पारदर्शक आणि कार्यक्षम पद्धतीने वाटचाल सुरू होईल असा विश्वास गोयल यांनी व्यक्त केला.

**आंबेडकर जयंती**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचा सोहळा त्यांच्या विचारांचा उत्सव म्हणून साजरा करूया, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 14 एप्रिल रोजी साजऱ्या होणाऱ्या 135व्या जयंतीच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह इथे आढावा बैठक झाली; त्यावेळी ते बोलत होते. महापुरुषांच्या जयंती साजरी करण्यामागील उद्देश केवळ औपचारिकता नसून, त्यांच्या विचारांची आणि कार्याची प्रेरणा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचणं आवश्यक आहे. हा सोहळा अधिक उत्तम पद्धतीने साजरा करण्याची जबाबदारी आपली असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

**बावनकुळे-आकृतीबंध**

अवकाळी पावसाशी संबंधित नियमांनुसार सर्वेक्षण करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्य सचिवांना दिले आहेत, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. ते काल नागपुरात नियोजन भवन इथं वार्ताहरांशी बोलत होते. राज्य शासनानं महसूल विभागासाठी 35 हजार 600 नवीन पदांना मंजुरी दिल्याची माहिती बावनकुळे यांनी दिली. या मंजुरीमुळे राज्यात 11 नवीन अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालयं, 8 नवीन एसडीओ कार्यालयं, 2 नवीन तहसीलदार कार्यालयं आणि 69 अपर तहसीलदार कार्यालयं तयार होणार आहेत.

**पुणे रेल्वे**

पुणे रेल्वे विभागाने 2025-26 या आर्थिक वर्षात 2 हजार 238 कोटी रुपयांचा महसूल मिळवला असून प्रवासी आणि तिकीट तपासणी उत्पन्नात मोठी वाढ नोंदवली आहे. पुण्याचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक राजेश कुमार वर्मा यांनी काल पत्रकार परिषदेत या वर्षभराच्या कामगिरीचा सविस्तर आढावा घेतला. यंदा पुणे विभागाच्या प्रवासी महसुलामध्ये 13 टक्क्यांची वाढ होऊन तो 1 हजार 657 कोटींवर पोहोचला आहे तर तिकीट तपासणीत 57 टक्क्यांच्या विक्रमी वाढीसह 30 कोटी रुपयांचा महसूल गोळा करण्यात आला आहे. सणांच्या काळात 1 हजार 109 विशेष गाड्या चालवण्यात आल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

**मुख्यमंत्री रोजगार-सांगली**

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाच्या अंतर्गत सांगली जिल्ह्याने 2025-26 या आर्थिक वर्षात उल्लेखनीय कामगिरी करत 176 टक्के उद्दिष्टपूर्ती साध्य केली आहे. त्यामुळे या योजनेच्या अंमलबजावणीत सांगली जिल्हा राज्यात अव्वल ठरला आहे. याबाबत जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक विद्या कुलकर्णी यांनी माहिती दिली. त्या म्हणाल्या....

**मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना या राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी योजनेमध्ये सांगली जिल्ह्यानं महाराष्ट्रामध्ये अव्वल स्थान मिळवून दिलेल्या एकूण उद्दिष्टाच्या एकशे शहात्तर टक्के एवढी उद्दिष्ट प्राप्ती केली. सांगली जिल्ह्यामध्ये तेराशे पंच्याहत्तर कर्ज प्रकरणांना बँकांनी मंजुरी दिली तर त्यापैकी चारशे अठ्ठ्याऐंशी कर्ज, प्रकरणांचं याच वर्षी वाटप झालं. या कर्ज प्रकरणांच्या वाटपाच्या अगेन्स्ट मिळालेलं अनुदान जे आहे तर ते वीस कोटीच्या अनुदानाचं वाटप झालेलं आहे. या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनामध्ये महिलां उद्योजकांचा महत्त्वाचा अगदी आणि लक्षणीयरीत्या वाटा आहे. सहाशे सत्त्याऐंशी महिलांना यावर्षी जिल्ह्यात कर्ज वाटप झालं.**

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात अमरावती जिल्ह्यानेही 1 हजार 55 प्रकरणांना मंजुरी देऊन उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

**सचिव दौरा**

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव म्हणून चंचल कुमार यांनी नुकताच पदभार स्वीकारला. चंचल कुमार आज पुणे दौऱ्यावर असून, ते भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्था, आणि राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाला भेट देणार आहेत. या दोन्ही संस्थांच्या, तसंच आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या अधिकाऱ्यांसमवेत ते बैठकही घेणार आहेत.

**शिवाजी महाराज पुण्यतिथी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त काल त्यांना राज्यासह देशभरातून आदरांजली अर्पण करण्यात आली. केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांनी शिवरायांना अभिवादन केलं. 'शिवाजी महाराजांनी धर्म आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी लोकांना संघटित करून हिंदवी स्वराज्याची स्थापना केली,' असं शहा यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांनीही हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या पावन स्मृतीला अभिवादन केलं. विधान भवनातील शिवाजी महाराजांच्या सिंहासनाधिष्ठित पुतळ्याला विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहिली. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी शिवरायांना अभिवादन करून शिवरायांचे तेजस्वी विचार, दूरदर्शी नेतृत्व आणि अतुलनीय कर्तृत्व आजही या मातीच्या कणाकणात जिवंत आहे असं म्हटलं आहे.

**गुड फ्रायडे**

गुडफ्रायडे निमित्त काल राज्यभर येशू ख्रिस्तांचं स्मरण करण्यात आलं. विविध चर्चमध्ये या निमित्त विशेष प्रार्थना करण्यात आली. यावेळी मोठ्या संख्येने ख्रिस्ती बांधव एकत्र जमले होते.

**नाशिक अपघात-नाशिक**

नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी इथं कार विहिरीत कोसळल्यानं एकाच कुटुंबातील 9 जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये 5 विद्यार्थ्यांचा समावेश आहे. एका खासगी शिकवणी वर्गाचं स्नेहसंमेलन आटोपून निघत असताना मंगल कार्यालयाजवळच असलेल्या शेतातील विहिरीत कार कोसळली.

**हवामान**

उद्या सकाळपर्यंत राज्याच्या बहुतांश भागात विजेच्या कडकडाटसह पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील काही भागात जोरदार पावसासह गारपीट होण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.